
# शब्बाथाचे पालन

एलेन व्हाइट



**November 2025**

ह्या पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी ह्यांनी केले आहे. तसेच पुनर्वाचनासाठी ताई वोईलेट डिसोझा ह्यांनी मदत केली आहे.

## **Testimonies, Volume 6,** पृष्ठ ३४९–३६८

शब्बाथाचे पालन

शब्बाथाच्या पालनामध्ये महान आशीर्वाद गुंफलेले आहेत, आणि देवाची इच्छा आहे की शब्बाथचा दिवस आपल्यासाठी आनंदाचा दिवस ठरावा. शब्बाथ स्थापन झाला त्या वेळीही आनंद होता. देवाने आपल्या हातांच्या कार्याकडे समाधानाने पाहिले. त्याने निर्माण केलेल्या सर्व गोष्टींबद्दल तो म्हणाला, “हे फारच चांगले आहे.” (उत्पत्ती १:३१) स्वर्ग आणि पृथ्वी आनंदाने भरून गेली होती. “पहाटचे तारे एकत्र गात होते, आणि देवाची सर्व मुले जयजयकार करीत होती.” (ईयोब ३८:७) जरी पापाने जगात प्रवेश करून देवाच्या परिपूर्ण कार्याला कलंक लावला असला, तरी देव अजूनही आपल्याला शब्बाथ देतो या साक्षीसाठी की एक सर्वशक्तिमान, असीम चांगुलपणाने आणि दयेने परिपूर्ण देवाने सर्व गोष्टी निर्माण केल्या. आपला स्वर्गीय पिता इच्छितो की शब्बाथाच्या पालनाद्वारे मानवांमध्ये त्याच्याबद्दलचे ज्ञान जतन केले जावे. तो इच्छितो की शब्बाथ आपले मन त्याच्याकडे म्हणजे खऱ्या आणि जिवंत देवाकडे वळवेल; आणि त्याला ओळखून आपण जीवन आणि शांती प्राप्त करू.

जेव्हा परमेश्वराने आपले लोक इस्राएलाला मिसराहून मुक्त केले आणि त्यांना आपले नियमशास्त्र दिले, तेव्हा त्याने त्यांना शिकविले की शब्बाथाचे पालन करून ते मूर्तिपूजकांपासून वेगळे ओळखले जातील. यामुळे देवाच्या सार्वभौमत्वाला मानणारे आणि त्याला आपला निर्माणकरता व राजा म्हणून स्वीकारण्यास नकार देणारे यांच्यात स्पष्ट भेद दिसून येत होता. परमेश्वर म्हणाला, “इस्राएल लोकांनी शब्बाथ पाळावा; शब्बाथ हा निरंतरचा करार समजून त्यांनी तो पिढ्यानपिढ्या पाळावा. माझ्यामध्ये व इस्राएल लोकांमध्ये ही निरंतरची खूण होय; कारण परमेश्वराने सहा दिवसांत आकाश व पृथ्वी निर्माण करून सातव्या दिवशी विसावा घेतला आणि त्याचा

श्रमपरिहार झाला."" (निर्गम ३१:१६,१७)

जसा शब्बाथ इस्राएलला मिसराहून बाहेर पडताना आणि पृथ्वीवरील कनानमध्ये प्रवेश करताना वेगळे दर्शवणारा चिन्ह होता, तसाच तो आज देवाच्या लोकांना जगापासून वेगळे दर्शवणारे चिन्ह आहे स्वर्गीय विश्रांतीत प्रवेश करण्यासाठी. शब्बाथ हे देव आणि त्याच्या लोकांमध्ये असलेल्या नात्याचे चिन्ह आहे.हे एक असे चिन्ह आहे की ते त्याच्या नियमशास्त्राचा सन्मान करतात आणि त्यामुळे तो देवाच्या विश्वासू प्रजा आणि त्याच्या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांमध्ये भेद निर्माण करतो.

स्तंभातील मेघातून ख्रिस्ताने शब्बाथाबद्दल घोषित केले: "तू इस्राएल लोकांना आणखी असे सांग की, तुम्ही माझे शब्बाथ अवश्य पाळावेत, कारण पिढ्यानपिढ्या तुमच्यामाझ्यामध्ये ही खूण आहे; ह्यावरून हे कळावे की, तुम्हांला पवित्र करणारा मी परमेश्वर आहे." (निर्गम ३१:१३)जगाला शब्बाथ हे दाखवते की देव हा निर्माण करता_आहे.याचे चिन्ह म्हणून देण्यात आले, तेच शब्बाथ त्याच्या पवित्रीकरण करणाऱ्या सामर्थ्याचेही चिन्ह आहे. ज्याने सर्व वस्तू निर्माण केल्या तेच सामर्थ्य मानवी आत्म्याला देवाच्या प्रतिमेत पुनर्निर्मित करते. जे शब्बाथाच्या दिवशी पावित्र्याने चालतात, त्यांच्यासाठी तो पवित्रीकरणाचे चिन्ह आहे. खरे पवित्रीकरण म्हणजे देवाशी सुसंवादी जीवन स्वभावात त्याच्यासोबत एकरूप होणे. हे त्या तत्त्वांच्या आज्ञापालनाने प्राप्त होते जी त्याच्या स्वभावाची प्रतिकृती आहेत. आणि शब्बाथ हे आज्ञापालनाचे चिन्ह आहे. जो मनापासून चौथी आज्ञा पाळतो तो सर्वच आज्ञा पाळील; कारण तो आज्ञापालनानेच पवित्र केला जातो.

इस्राएलाप्रमाणेच आपल्यालाही शब्बाथ "निरंतरचा करार" म्हणून देण्यात आला आहे. जे त्याच्या पवित्र दिवसाचा मान राखतात, त्यांच्यासाठी शब्बाथ हे देव त्यांना आपली निवडलेली प्रजा मानतो, हे याचे चिन्ह आहे. हे त्यांच्याशी केलेल्या कराराची पूर्तता करण्याचे त्याचे प्रतिज्ञापत्र आहे.

देवाच्या राज्याच्या या चिन्हाला स्वीकारणारा प्रत्येक जीव स्वतःला देवाच्या सनातन कराराच्या आधीन करतो. तो स्वतःला आज्ञापालनाच्या सुवर्णसाखळीस जोडतो जिच्या प्रत्येक कडीमध्ये एक एक दैवी प्रतिज्ञा गुंफलेली आहे.

दहा आज्ञांमध्ये केवळ चौथी आज्ञाच महान विधिनिर्मात्याची शिक्कामोर्तब असलेली आहे म्हणजे आकाश व पृथ्वीच्या सर्जनहाराची. या आज्ञेचे पालन करणारे त्याचे नाव स्वतःवर घेतात, आणि त्या नावाच्या अर्थातील सर्व आशीर्वाद त्यांचे होतात.

"परमेश्वर मोशेला म्हणाला, "अहरोन व त्याचे मुलगे ह्यांना असे सांग की, तुम्ही इस्राएल लोकांना आशीर्वाद देताना ह्याप्रमाणे म्हणा : 'परमेश्वर तुला आशीर्वाद देवो व तुझे संरक्षण करो; परमेश्वर आपला मुखप्रकाश तुझ्यावर पाडो व तुझ्यावर कृपा करो; परमेश्वर तुझ्याकडे प्रसन्नमुख करो आणि तुला शांती देवो.' ह्या रीतीने त्यांनी इस्राएल लोकांवर माझे नाव मुद्रित करावे म्हणजे मी त्यांना आशीर्वाद देईन." (गणना ६:२२–२७)

मोशेद्वारे ही प्रतिज्ञाही देण्यात आली होती: "तू आपला देव परमेश्वर ह्याच्या आज्ञा पाळून त्याच्या मार्गांनी चालशील तर तो आपल्या शपथेला जागून तुला आपली पवित्र प्रजा करून स्थिर ठेवील. परमेश्वराचे नाव तुला दिले आहे हे पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे पाहतील तेव्हा त्यांना तुझा धाक वाटेल, आणि जी भूमी तुला देण्याची परमेश्वराने तुझ्या पूर्वजांशी शपथ वाहिली होती तिच्यात तुझ्या पोटचे फळ, तुझ्या गुराढोरांचे वत्स व तुझ्या भूमीचा उपज ह्यांची तुझ्या कल्याणासाठी तो अभिवृद्धी करील. परमेश्वर तुझ्यासाठी आपले उत्तम भांडार म्हणजे आकाश खुले करून तुझ्या भूमीवर योग्य ऋतूत पाऊस पाडील, व तुझ्या हातच्या सर्व कामाला बरकत देईल; तू पुष्कळ राष्ट्रांना उसने देशील पण तुला कोणाकडूनही उसने घ्यावे लागणार नाही. तुझा देव परमेश्वर ह्याच्या ज्या ह्या आज्ञा मी आज तुला देत आहे त्या ऐकून तू

काळजीपूर्वक पाळशील तर परमेश्वर तुला पुच्छ नव्हे तर मस्तक करील, तू खाली नव्हे तर वर राहशील.” (अनुवाद २८:९–१३

पवित्र आत्म्याद्वारे प्रेरित स्तोत्रकर्ताही म्हणतो:

याहो या, आपण परमेश्वराचा जयजयकार करू; आपल्या तारणदुर्गाचा जयजयकार करू. उपकारस्मरण करीत आपण त्याच्यापुढे जाऊ, स्तोत्रे गात त्याचा जयजयकार करू. कारण परमेश्वर थोर देव आहे; सर्व देवांहून तो थोर राजा आहे.

त्याच्या हाती पृथ्वीची खोल स्थले आहेत; पर्वतांची उंच शिखरेही त्याचीच आहेत. समुद्र त्याचा आहे, त्यानेच तो उत्पन्न केला; कोरडी भूमीही त्याच्याच हाताने घडवली गेली.

याहो या, परमेश्वर जो आपला उत्पन्नकर्ता त्याच्यापुढे आपण गुडघे टेकू; त्याची उपासना करू, त्याला नमन करू. कारण तो आपला देव आहे, आणि आपण त्याच्या कुरणातील प्रजा, त्याच्या हातचा कळप आहोत. आज तुम्ही त्याची वाणी ऐकाल तर किती बरे होईल!

परमेश्वर हाच देव आहे हे जाणा; त्यानेच आम्हांला उत्पन्न केले; आम्ही त्याचेच आहोत आम्ही त्याची प्रजा, त्याच्या कुरणातील कळप आहोत.

(स्तोत्र ९५:१–७) (स्तोत्र १००:३, R.V.)

इस्राएलाला दिलेल्या या प्रतिज्ञा आजही देवाच्या लोकांसाठी आहेत. ह्याच संदेशांची आठवण शब्बाथ आपल्याला करून देतो.

## शब्बाथ पाळण्यात सुधारणा

शब्बाथ हा देव आणि त्याच्या लोकांना एकत्र बांधणारा सुवर्ण-कवच आहे. परंतु शब्बाथाची आज्ञा भंग करण्यात आली आहे. देवाचा पवित्र दिवस अपवित्र केला गेला आहे. पापी मनुष्याने शब्बाथाला त्याच्या योग्य जागेतून हटविले आहे आणि त्याऐवजी एक सर्वसाधारण कामाचा दिवस उंचावून बसविला आहे. देवाच्या नियमामध्ये एक भेग पाडली गेली आहे, आणि ही भेग दुरुस्त केली जाणे आवश्यक आहे. देवाच्या विश्रांतीच्या दिवसाच्या रूपात खरा शब्बाथ पुन्हा त्याच्या योग्य स्थानावर उंचावला जाईल. यशया अध्याय ५८ मध्ये देवाच्या लोकांनी करावयाचे कार्य स्पष्टपणे दाखविले आहे. त्यांनी नियमशास्त्राला मोठे करावे आणि त्याला गौरवशाली करावे; जुन्या उद्ध्वस्त जागा पुन्हा उभाराव्यात; अनेक पिढ्यांच्या पाया पुन्हा उभे करावेत. जे हे कार्य करतील त्यांना देव म्हणतो: “बहुत काळ मोडून पडलेली शहरे तुझे लोक पुन्हा बांधतील; पूर्वीच्या पिढ्यांनी घातलेले पाये तू पुन्हा उभारशील; मोडतोडीचा जीर्णोद्धार करणारा, वस्ती होण्यासाठी रस्त्यांची दुरुस्ती करणारा, असे तुझे नाव पडेल. तू शब्बाथाची पायमल्ली करणार नाहीस, माझ्या पवित्र दिवशी आपला उद्योगधंदा करणार नाहीस, शब्बाथ आनंददिन आहे, परमेश्वराचा पवित्र व सन्मान्य दिन आहे असे म्हणून त्याचा आदर करशील; व त्या दिवशी आपले कामकाज करणार नाहीस, आपला धंदा चालवणार नाहीस, वायफळ गोष्टी बोलत बसणार नाहीस; तर तू परमेश्वराच्या ठायी हर्ष पावशील; तू देशाच्या उच्च स्थलांचे जयोत्साहाने आक्रमण करशील, असे मी करीन; आणि तुझा पिता याकोब ह्याच्या वतनाचा तुला उपभोग घेऊ देईन; परमेश्वराच्या तोंडचे हे शब्द आहेत.” (यशया ५८:१२–१४)

शब्बाथाचा विषय हा त्या महान अंतिम संघर्षातील मुख्य मुद्दा ठरणार आहे, ज्यामध्ये संपूर्ण जग सहभाग घेईल. मनुष्यांनी स्वर्गात राज्य करणाऱ्या सिद्धांतांपेक्षा सैतानाच्या सिद्धांतांचा अधिक मान केला आहे. त्यांनी त्या खोट्या शब्बाथाला स्वीकारले आहे, ज्याला सैतानाने आपल्या अधिकाराचे चिन्ह म्हणून उंचावले आहे. परंतु देवाने आपल्या राजाज्ञेवर स्वतःची मुद्रा ठेवली आहे. प्रत्येक शब्बाथ संस्थेवर तिच्या कर्त्याचे नाव कोरलेले असते एक अशी छाप जी त्या त्या सत्ताधारीचा अधिकार स्पष्टपणे दर्शवते. लोकांना हे समजावून देणे हा आपला कार्यभाग आहे. आपण त्यांना दाखविले पाहिजे की ते देवाच्या राज्याची खूण धारण करतात की बंडखोर राज्याची यावर त्यांचे भविष्य अवलंबून आहे. कारण ज्याची खूण ते धारण करतात, त्याच राज्याचे ते प्रजाजन असल्याचे ते मान्य करतात. देवाने आपल्याला त्याच्या तुडविलेल्या शब्बाथाचा ध्वज पुन्हा उंचावण्यासाठी बोलावले आहे.

शब्बाथ पाळतान आपले उदाहरण योग्य असणे खूप  महत्त्वाचे आहे!

नवीन मंडळ्या स्थापन करताना सेवाकार्य करणाऱ्या पास्टरांनी शब्बाथ कसा योग्य रीतीने पाळावा याबद्दल काळजीपूर्वक शिक्षण द्यावे. आपण सावध राहिले पाहिजे ज्याप्रकारचे शिथिल आचरण रविवारी पाळणाऱ्यांमध्ये सर्वसाधारणपणे दिसते, ते देवाच्या पवित्र विश्रांतीच्या दिवसाचे पालन करणारे असल्याचा दावा करणाऱ्यांनी अंगीकारू नये. देवाच्या राज्याची खूण धारण करणारे आणि बंडखोर राज्याची खूण धारण करणारे यांच्यातील भेद स्पष्ट व ठळक असला पाहिजे.

अनेक जण जे स्वतःला शब्बाथपालक म्हणवतात ते ज्या प्रमाणात शब्बाथाचे पवित्रीकरण करतात, त्या पेक्षा शब्बाथ खूपच अधिक पवित्र आहे. ज्यांनी शब्बाथाची आज्ञेनुसार अक्षरशः आणि आत्म्याने पालन केले नाही, त्यांच्यामुळे परमेश्वराचे फार अपमान झाले आहे. म्हणूनच देव शब्बाथाच्या पालनामध्ये सुधारणा करण्याचे आवाहन करतो.

शब्बाथासाठी तयारी

चौथ्या आज्ञेच्या सुरुवातीला परमेश्वर म्हणतो: “आठवण.” कारण त्याला माहीत होते की जीवनातील असंख्य काळजी, कष्ट आणि चिंतेमध्ये मनुष्य संपूर्ण आज्ञेचे पालन करण्याच्या अपेक्षेतून स्वतःला सुट देण्याचा प्रयत्न करील किंवा त्या आज्ञेचे पवित्र महत्त्व विसरेल. म्हणूनच तो म्हणाला: “शब्बाथ दिवसाची आठवण ठेवून तो पवित्रपणे पाळ.” (निर्गम २०:८)

आपण संपूर्ण आठवडा शब्बाथ लक्षात ठेवून, आज्ञेनुसार त्याचे पवित्रीकरण करण्यासाठी तयारीत असले पाहिजे. आपण फक्त कायदेशीर कर्तव्य म्हणून शब्बाथ पाळू नये; तर जीवनातील सर्व व्यवहारांवर त्याचा आध्यात्मिक प्रभाव काय आहे हे समजून घेतले पाहिजे. जे सर्व लोक शब्बाथाला स्वतः आणि देव यांच्यामधील खूण मानतात की देव त्यांना पवित्र करणारा आहे ते देवाच्या राज्याच्या तत्त्वांचे प्रतिनिधित्व करतील. ते त्याच्या राज्याचे नियम आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणतील. त्यांची ही दैनंदिन प्रार्थना असेल की शब्बाथाची पवित्रीकरणाची कृपा त्यांच्यावर नित्य असो. दररोज ते ख्रिस्ताच्या सहवासात राहतील आणि त्याच्या स्वभावातील परिपूर्णता आपल्या जीवनात प्रकट करतील. दररोज त्यांचा प्रकाश त्यांच्या चांगल्या कामांद्वारे इतरांसमोर चमकत राहील.

देवाच्या कार्याच्या यशाशी संबंधित प्रत्येक बाबतीत पहिल्या विजयांची प्राप्ती घरच्या जीवनातच व्हायला हवी. शब्बाथासाठीची तयारी येथे घरातच सुरू झाली पाहिजे. संपूर्ण आठवडाभर पालकांनी हे स्मरणात ठेवावे की त्यांचे घर हे असे विद्यालय आहे जिथे त्यांच्या मुलांना स्वर्गातील दरबारासाठी तयार केले जात आहे. त्यांच्या तोंडून निघणारे प्रत्येक शब्द योग्य असावेत. मुलांनी ऐकू नये असे कोणतेही शब्द त्यांच्या ओठांवर येऊ नयेत. त्यांच्या आत्म्यात चिडचिडीस जागा नसावी. पालकांनो, आठवड्यातील प्रत्येक दिवस तुम्ही पवित्र देवाच्या साक्षीने जगा ज्याने तुम्हाला त्याच्यासाठी मुले शिकविण्यास दिली आहेत. आपल्या घरातील या “लहान मंडळीला”

त्याच्यासाठी तयार करा, जेणेकरून शब्बाथाच्या दिवशी सर्वजण प्रभूच्या पवित्रस्थानात उपासनेसाठी तयार असतील. प्रत्येक सकाळी आणि संध्याकाळी आपल्या मुलांना देवापुढे अर्पण करा की ते त्याच्या रक्ताने विकत घेतलेले वारस आहेत. त्यांना शिकवा की देवावर प्रेम करणे आणि त्याची सेवा करणे ही त्यांची सर्वात मोठी कर्तव्य आणि सर्वोच्च विशेषाधिकार आहे.

पालकांनी हे विशेष लक्षात ठेवावे की देवाची उपासना ही त्यांच्या मुलांसाठी एक जिवंत शिकवण बनली पाहिजे. बायबलमधील वचने त्यांच्या ओठांवर वारंवार यावीत विशेषतः ती वचने जी हृदयाला आध्यात्मिक सेवेसाठी तयार करतात. ही अमूल्य वचने वारंवार उच्चारली जावीत: "हे माझ्या जिवा, तू केवळ देवावर भिस्त टाकून स्वस्थ राहा; कारण माझी आशापूर्ती करणारा तो आहे." (स्तोत्र ६२:५)

शब्बाथ असा स्मरणात ठेवला गेला की, सांसारिक गोष्टींना आध्यात्मिक गोष्टींवर अतिक्रमण करू दिले जाणार नाही. सहा दिवसांच्या कामाशी संबंधित कोणतेही कर्तव्य शब्बाथासाठी उरवले जाणार नाही. आठवडाभर आपण इतक्या सांसारिक श्रमात थकून जाणार नाही की, ज्यादिवशी प्रभूने विश्रांती घेतली आणि ताजेतवाने झाला, त्या दिवशी आपण त्याची सेवा करण्यासाठी अशक्त होऊ.

जरी संपूर्ण आठवडा शब्बाथासाठी तयारी केली पाहिजे, तरी शुक्रवार हा विशेष तयारीचा दिवस म्हणून ठेवला गेला आहे. मोशेद्वारे परमेश्वराने इस्राएलला सांगितले: "तो त्यांना म्हणाला, "परमेश्वराचे सांगणे असे आहे की, उद्या विसाव्याचा दिवस, परमेश्वराचा पवित्र शब्बाथ आहे; तुम्हांला भाजायचे ते भाजा आणि शिजवायचे ते शिजवा. जे काही उरेल ते आपल्यासाठी सकाळपर्यंत ठेवा." (निर्गम १६:२३) "लोक चोहीकडे फिरून तो गोळा करत. जात्यांत दळीत किंवा उखळांत कुटत आणि मग भांड्यांत शिजवून त्याच्या

भाकरी करत; तेलात तळलेल्या पुरीसारखी त्याची चव असे.” (गणना ११:८) इस्राएलांच्या मुलांसाठी स्वर्गातून आलेल्या या अन्नाची तयारी करावयाची होती. परमेश्वराने स्पष्ट सांगितले की हे कार्य शुक्रवारी तयारीच्या दिवशी केले पाहिजे. ही त्यांच्यासाठी एक परीक्षा होती. देव पाहू इच्छित होता की ते शब्बाथ पवित्र ठेवतील की नाही.

ही सूचना, जी स्वतः यहोवाच्या ओठांतून निघाली, ती आपल्या शिक्षणासाठी आहे. बायबल हे परिपूर्ण मार्गदर्शक आहे; आणि जर त्याच्या वचनांचे प्रार्थनेने, समजून घेण्याची इच्छा असलेल्या हृदयाने अध्ययन केले गेले, तर या विषयात कोणालाही चुकीचे जाण्याची गरज नाही. अनेकांना या गोष्टीचे शिक्षण आवश्यक आहे की शब्बाथच्या दिवशी उपासनेच्या सभेत कसे उपस्थित व्हावे. आठवड्यातील सर्वसाधारण कपड्यांतील स्वरूपात आपण देवाच्या उपस्थितीत प्रवेश करू नये. प्रत्येकाकडे विशेष शब्बाथासाठीचे कपडे असावेत देवाच्या घरातील सभेला जाताना परिधान करण्यासाठी. आपण सांसारिक फॅशनचे अनुकरण करू नये, परंतु आपल्या बाह्य स्वरूपाबाबत उदासीनही राहू नये. आपण स्वच्छ आणि नीटनेटके असले पाहिजे परंतु अलंकाराशिवाय. देवाची मुले आतून आणि बाहेरून पवित्र असावीत.

शुक्रवारी शब्बाथासाठीची सर्व तयारी पूर्ण झाली पाहिजे. सर्व कपडे तयार आहेत का, सर्व स्वयंपाक पूर्ण आहे का हे पहा. पायजोडे स्वच्छ केले जावेत, अंघोळी करून घ्याव्यात. हे पूर्णपणे शक्य आहे; आपण याला नियम बनवला तर आपण नक्की करू शकाल. शब्बाथ कपड्यांची दुरुस्ती, भोजन शिजविणे, मनोरंजन किंवा अन्य कोणत्याही सांसारिक कामासाठी वापरला जाऊ नये. सूर्यास्त होण्यापूर्वीच सर्व सांसारिक काम बाजूला ठेवावे, आणि सांसारिक कागदपत्रे नजरेआड ठेवावीत. पालकांनो, आपल्या मुलांना तुमची तयारी आणि तिचा उद्देश समजावून सांगा, आणि त्यांनाही आज्ञेनुसार शब्बाथ राखण्यासाठीच्या तयारीत सहभागी होऊ द्या.

आपण शब्बाथाच्या सीमा काळजीपूर्वक जपल्या पाहिजेत. लक्षात ठेवा प्रत्येक क्षण हा पवित्र, अर्पण केलेला काळ आहे. जिथे शक्य असेल, तिथे

नियोक्त्यांनी आपल्या कामगारांना शुक्रवार दुपारपासून शब्बाथ सुरू होईपर्यंतचा वेळ द्यावा त्यांनी मन शांत ठेवून प्रभूचा दिवस स्वागत करण्यासाठी तयारी करता यावी म्हणून. असे केल्याने तुम्हाला सांसारिक गोष्टींमध्येही कोणताही तोटा होणार नाही.

तयारीच्या दिवशी आणखी एक महत्त्वाचे कार्य आहे ज्याकडे लक्ष दिले पाहिजे. या दिवशी कुटुंबामध्ये किंवा मंडळीत बंधुभावातील सर्व मतभेद दूर केले पाहिजेत. कटुता, राग, द्वेष ह्या सर्व गोष्टी आत्म्यातून काढून टाकल्या पाहिजेत. नम्र आत्म्याने, "तेव्हा तुम्ही निरोगी व्हावे म्हणून आपली पातके एकमेकांजवळ कबूल करून एकमेकांसाठी प्रार्थना करा. नीतिमानाची प्रार्थना कार्य करण्यात फार प्रबळ असते." (याकोब ५:१६)

शब्बाथ सुरू होण्यापूर्वी मन आणि शरीर दोन्हीही सांसारिक कार्यांपासून बाजूला घेतले पाहिजेत. देवाने सहा कामकाजाच्या दिवसांच्या शेवटी शब्बाथ स्थापन केला, जेणेकरून मनुष्य थांबून आठवडाभरात त्याने पवित्र राज्यासाठी ज्यात कोणत्याही अपराध्यास प्रवेश नाही काय प्राप्त केले आहे हे तो ध्यानात घेईल. प्रत्येक शब्बाथ आपण आपल्या आत्म्याची तपासणी केली पाहिजे गेल्या आठवड्याने आपल्यात आध्यात्मिक वाढ झाली की हानी?

ह्यास्तव इस्राएलाचा देव परमेश्वर म्हणतो, तुझे घराणे व तुझ्या बापाचे घराणे माझ्यासमोर निरंतर चालू राहील असे मी म्हटले होते खरे, पण आता परमेश्वर म्हणतो, असे माझ्या हातून न घडो; कारण जे माझा आदर करतात त्यांचा मी आदर करीन आणि जे मला तुच्छ मानतात त्यांचा अवमान होईल." (१ शमुवेल २:३०)

## घरातील शब्बाथ

सूर्यास्त होण्यापूर्वी कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकत्र जमून देवाचे वचन

वाचावे, स्तुतीगीत गायला पाहिजे आणि प्रार्थना करावी. येथे सुधारणा करण्याची मोठी आवश्यकता आहे, कारण अनेकांनी याकडे दुर्लक्ष केले आहे. आपल्याला देवापुढे आणि एकमेकांसमोर नम्रपणे कबुली द्‍यावी लागेल. आपण नव्याने सुरुवात करून अशी व्यवस्था केली पाहिजे की कुटुंबातील प्रत्येक सदस्य देवाने आशीर्वादित आणि पवित्र केलेल्या या दिवसाचा सन्मान करण्यास तयार असेल.

शब्बाथाचे अमूल्य तास झोपेसाठी वाया घालवू नयेत. शब्बातहाच्या सकाळी कुटुंबाने लवकर उठले पाहिजे. उशिरा उठल्यास न्याहारी आणि शब्बाथ-शाळेच्या तयारीत गडबड, घाई, धक्का-बुक्की आणि चिडचिड होते. यामुळे घरात अपवित्र भावना येतात. अशा रीतीने शब्बाथाचे अपमान केल्याने तो दिवस भारदस्त वाटू लागतो आणि त्याचे आगमन आनंदाऐवजी भीतीचा विषय बनून जातो. शब्बाथ हा आनंदाचा आणि पवित्रता अनुभवण्याचा दिवस असावा, भार वाटण्याचा नाही.

शब्बाथाच्या दिवशी इतर दिवसांपेक्षा अनेक किंवा अधिक प्रमाणातील अन्नाची व्यवस्था करू नये. उलट, अन्न अधिक साधे असावे आणि कमी प्रमाणात खावे, जेणेकरून मन स्पष्ट आणि सामर्थ्यशाली राहील, आणि आध्यात्मिक गोष्टी समजणे सोपे होईल. अतिखाण्यामुळे मेंदू बोथट होतो. अतिशय मौल्यवान शब्द ऐकले गेले तरी त्यांची कदर होत नाही, कारण अनुचित आहारामुळे मन गोंधळलेले असते. शब्बाथाच्या दिवशी अतिखाण्यामुळे अनेकांनी आपल्या कल्पनेपेक्षा अधिक देवाचा अनादर केला आहे. (6T 357.2)

शब्बाथाच्या दिवशी स्वयंपाक करण्याचे टाळावे, परंतु थंड अन्न खाण्याची गरज नाही. थंड हवामानात मागील दिवशी तयार केलेले अन्न गरम करता येते. आणि भोजन साधे असले तरी ते चविष्ट आणि आकर्षक असावे. कुटुंबाला दररोज न मिळणारी एखादी खास गोष्ट लहानशी मेजवानी उपलब्ध करून द्‍यावी. (6T 357.3)

कौटुंबिक उपासनेत मुलांनीही भाग घ्यावा. सर्वांनी आपापले बायबल घ्यावे आणि प्रत्येकाने एक-दोन वचने वाचावीत. नंतर एखादे परिचित स्तुतीगीत गावे आणि मग प्रार्थना करावी. यासाठी ख्रिस्ताने एक नमुना दिला आहे. प्रभूची प्रार्थना ही फक्त पाठ करण्यासाठी नसून आपल्या प्रार्थना कशा असाव्यात याचे उदाहरण आहे साध्या, मनापासून, आणि सर्वसमावेशक. साध्या विनंतीत तुमच्या गरजा परमेश्वरापुढे मांडा आणि त्याच्या दयेबद्दल कृतज्ञता व्यक्त करा. अशा रीतीने तुम्ही येशूला आपल्या घरात आणि हृदयात स्वागताचा पाहुणा म्हणून आमंत्रित करता. (6T 358) कुटुंबातील उपासनावेळी दूरच्या विषयांवरील लांब प्रार्थना योग्य नाहीत. ते प्रार्थनेची वेळ थकवणारी बनवतात ज्या वेळेला आपण याचा अनुभव आशीर्वाद आणि विशेषाधिकार म्हणून घ्यायला हवा. ही वेळ रंजक आणि आनंददायक बनवा.

शब्बाथशाळा आणि उपासनेची सभा शब्बाथाचा फक्त एक भाग घेतात. कुटुंबासाठी उरलेला वेळ हा संपूर्ण शब्बाथातील सर्वात पवित्र व मौल्यवान ठरू शकतो. या काळातील बराचसा वेळ पालकांनी आपल्या मुलांसोबत घालवावा. अनेक कुटुंबांत लहान मुले स्वतःला कसे मनोरंजन मिळेल यासाठी एकटी सोडली जातात. एकटी राहिल्यावर ती लगेच अस्वस्थ होतात, खेळायला लागतात किंवा एखाद्या खोडकर गोष्टीत गुंततात. परिणामी शब्बाथ त्यांच्यासाठी कोणताही पवित्र अर्थ राखून राहत नाही.

आनंदी, प्रसन्न हवामानात पालकांनी आपल्या मुलांसमवेत रानांत, बागांत आणि वृक्षछायेखाली फिरायला जावे. निसर्गातील त्या सुंदर गोष्टींच्या मध्यभागी त्यांना शब्बाथाची स्थापना का करण्यात आली हे सांगावे. देवाच्या महान सृष्टीकार्याचे वर्णन करावे. त्यांना सांगावे की जेव्हा पृथ्वी देवाच्या हातून बाहेर आली, तेव्हा ती पवित्र आणि अत्यंत सुंदर होती. प्रत्येक फूल, प्रत्येक झुडूप, प्रत्येक वृक्ष आपल्या सर्जकाच्या हेतूची पूर्ण पूर्तता करीत होता. डोळे ज्या गोष्टीवर पडत ते सर्व मोहक होते आणि मनाला देवाच्या प्रेमाची आठवण करून देत होते. प्रत्येक स्वर हा देवाच्या आवाजाशी सूर जुळवणारे

संगीत होता. त्यांना दाखवा की पापाने देवाच्या परिपूर्ण कार्याला विद्रूप केले; काटे-निश्वास, दु:ख, वेदना आणि मृत्यू हे सर्व देवाच्या आज्ञाभंगाचे परिणाम आहेत. त्यांना हेही दाखवा की जग पापाच्या शापाने विदीर्ण झाले असले तरी पृथ्वीवर सर्वत्र देवाचा चांगुलपणा अजूनही दिसून येतो हिरवीगार शेती, उंच उंच वृक्ष, आनंद देणारा सूर्यप्रकाश, ढग, दवबिंदू, रात्रीची गंभीर शांतता, ताऱ्यांनी सजलेले आकाश आणि सुंदर चंद्र हे सर्व सृष्टीकर्त्याचे साक्षीदार आहेत. आपल्या कृतघ्न जगावर पडणारा प्रत्येक थेंब पाऊस आणि उजेडाचा प्रत्येक किरण हे सर्व देवाच्या संयम आणि प्रेमाची साक्ष देतात.

मुलांना तारणाचा मार्ग सांगा कसे “देवाने जगावर एवढे प्रेम केले की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, जेणेकरून जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवील तो नाश पावणार नाही, तर त्याला अंतकाळचे जीवन प्राप्त होईल.” (योहान ३:१६) बेथलेहेमची गोड कथा त्यांना पुन्हा सांगा. मुलांसमोर येशूला असा दाखवा की तो आपल्या पालकांचा आज्ञाधारक मुलगा होता, तरुणपणी तो विश्वासू व परिश्रमी होता, आणि घराच्या उत्पन्नात मदत करीत होता. यामुळे तुम्ही त्यांना शिकवू शकता की तारणारा तरुणांच्या परीक्षा, गोंधळ, प्रलोभने, त्यांच्या आशा आणि आनंद ह्या सर्व गोष्टी समजतो आणि त्यांच्याशी सहानुभूती दाखवून त्यांना मदत करू शकतो. कधीमधी त्यांच्या बरोबर बायबल इतिहासातील आकर्षक कथा वाचा. त्यांना विचारत राहा की शब्बाथ शाळेत त्यांनी काय शिकले. आणि पुढील शब्बाथातील धडा त्यांच्या सोबत बसून अभ्यासा.

सूर्य मावळत चालला की, प्रार्थनेचा स्वर आणि स्तुतीगीताचे सूर पवित्र वेळेचा समारोप दर्शवू देत, आणि आठवडाभराच्या श्रमांतून येणाऱ्या काळजीच्या क्षणांमध्ये देवाच्या उपस्थितीला आमंत्रण देऊ देत.

अशा रीतीने पालक शब्बाथाचा दिवस जसा तो असायला हवा तसा आठवड्यातील सर्वांत आनंदाचा दिवस बनवू शकतात. ते आपल्या मुलांना तो “आनंद देणारा दिवस, दिवसांपैकी श्रेष्ठ दिवस, परमेश्वराचा पवित्र व माननीय दिवस” म्हणून मानायला शिकवू शकतात.

माझ्या बंधू-भगिनींनो, मी तुम्हांला सल्ला देतो, “शब्बाथ दिनाचे स्मरण ठेवा, तो पवित्र माना”. जर तुम्हाला तुमच्या मुलांनी आज्ञेप्रमाणे शब्बाथ पाळावा असे वाटत असेल, तर तुम्ही त्यांना शिकवले पाहिजे शब्दांनीही आणि स्वतःच्या आचरणातूनही. हृदयावर खोलवर कोरलेले सत्य कधीही पूर्णपणे पुसले जात नाही. ते कधी धूसर होऊ शकतो, पण नष्ट होत नाही. लहानपणी मनावर उमटलेले ठसे पुढील वर्षांत दिसून येतात. काही वेळा परिस्थिती मुलांना त्यांच्या पालकांपासून आणि घरापासून दूर नेऊ शकते, परंतु ते जगत असतील तोवर बालपणात आणि तरुणपणात दिलेले शिक्षण त्यांच्यासाठी आशीर्वाद ठरते.

## शब्बाथ दिवशी प्रवास करण्याबद्दल

आपण आज्ञाधारकांना दिलेल्या आशीर्वादाची इच्छा करीत असू, तर आपल्याला शब्बाथ अधिक काटेकोरपणे पाळला पाहिजे. मला भीती आहे की आपण या दिवशी अनेकदा प्रवास करतो, जरी तो टाळणे शक्य असते. शब्बाथ पाळण्याबाबत परमेश्वराने दिलेल्या प्रकाशाच्या अनुरोधाने, या दिवशी जहाजाने किंवा रेल्वेने प्रवास करण्याबाबत आपण अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे. या बाबतीत आपल्याने आपल्या मुलांसमोर आणि तरुणांसमोर योग्य आदर्श ठेवला पाहिजे. ज्या मंडळ्यांना आपल्या मदतीची गरज आहे त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी आणि देव त्यांना ऐकवू इच्छित असलेला संदेश देण्यासाठी कधी कधी शब्बाथ दिवशी प्रवास करणे आवश्यक ठरू शकते; पण शक्य तितके आपण आपली तिकिटे आणि आवश्यक तयारी इतर दिवशी करून ठेवली पाहिजे. प्रवासास निघताना आपण शक्य ते प्रत्येक नियोजन असे केले पाहिजे की आपले स्थान शब्बाथ दिवशी गाठण्याचे टाळले जाईल.

शब्बाथ दिवशी प्रवास करणे अपरिहार्य झाले तर, आपले लक्ष सांसारिक गोष्टींकडे वळवणाऱ्या लोकांच्या सहवासापासून आपण शक्य तितके दूर

राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपले मन देवावर स्थिर ठेवावे आणि त्याच्याशी सतत सहवास साधावा. संधी मिळेल तेथे आपण इतरांशी सत्याविषयी बोलले पाहिजे. दु:ख कमी करण्यासाठी किंवा गरजूंना मदत करण्यासाठी आपण सदैव तयार असले पाहिजे. अशा प्रसंगी देवाने दिलेले ज्ञान आणि शहाणपण वापरण्यास तो स्वतः इच्छितो. पण आपण व्यवसायविषयक गोष्टी बोलू नयेत किंवा सामान्य, सांसारिक संभाषणात गुंतू नये. कुठेही असलो, केव्हाही असलो, देव आपल्याकडून शब्बाथाचा आदर करून त्याच्या प्रति आपली निष्ठा सिद्ध करण्याची अपेक्षा करतो.

शब्बाथ सभांविषयी

ख्रिस्त म्हणतो, “कारण जेथे दोघे किंवा तिघे माझ्या नावाने जमले आहेत तेथे त्यांच्यामध्ये मी आहे.” (मत्तय १८:२०) जिथे किमान दोन किंवा तीन विश्वासणारे असतील, त्यांनी शब्बाथ दिवशी एकत्र जमावे आणि परमेश्वराच्या या वचनाचा दावा करावा.

देवाच्या पवित्र दिवशी त्याची उपासना करण्यासाठी जमलेल्या अशा छोट्या गटांना यहोवाच्या समृद्ध आशीर्वादाचा अधिकार आहे. त्यांनी हे विश्वासाने मानावे की प्रभु येशू त्यांच्या सभांमध्ये आदराचा पाहुणा आहे. प्रत्येक खरा उपासक जो शब्बाथ पवित्र राखतो, त्याने या वचनाचा दावा करावा: “तुम्हांला पवित्र करणारा मी परमेश्वर आहे” (निर्गम ३१:१३)

आपल्या शब्बाथ सभांतील प्रवचन सामान्यतः थोडक्यात असावे. देवावर प्रेम करणाऱ्यांना त्याच्या प्रति कृतज्ञता आणि उपासना व्यक्त करण्याची संधी द्यावी.

जेव्हा मंडळीमध्ये पाळक नसतो, तेव्हा एखाद्याची सभेचा पुढारी म्हणून

निवड करावी. पण त्याने दीर्घ प्रवचन देणे किंवा सभेचा मोठा वेळ व्यापणे आवश्यक नाही. बायबलमधील एखादी छोटी, रंजक वाचनकथा अनेक वेळा प्रवचनापेक्षा अधिक लाभदायक ठरते. आणि त्यानंतर प्रार्थना व साक्षांच्या सभेला सुरुवात केली जाऊ शकते.

ज्यांच्यावर मंडळीमध्ये पुढारीपदाची जबाबदारी आहे त्यांनी आठवड्यात इतके शारीरिक व मानसिक श्रम करू नयेत की शब्बाथ येईपर्यंत ते इतके थकून जातील की ख्रिस्ताच्या सुवार्तेचा जीवनदायी प्रभाव सभेमध्ये आणू शकणार नाहीत. दैनंदिन, सांसारिक कामकाज थोडे कमी करा; परंतु शब्बाथ दिवशी देवाला असे सेवाकार्य अर्पण करून त्याची हानी करू नका, जे तो स्वीकारू शकत नाही. तुम्ही अशा लोकांसारखे राहू नका ज्यांच्यात आध्यात्मिक जीवन नाही. शब्बाथाच्या दिवशी लोकांना तुमच्या मदतीची गरज असते. त्यांना देववचनातील आहार द्या. देवाच्या पवित्र दिवशी त्याला तुमची उत्तम देणगी अर्पण करा. आत्म्याचे मौल्यवान जीवन त्याला समर्पित सेवेत अर्पण केले जावे.

उपासनेसाठी जमलेल्या स्थळी कोणीही झोप काढण्यासाठी येऊ नये. देवाच्या घरात झोपणे योग्य नाही. दैनंदिन व्यवसाय करताना तुम्ही झोपत नाही, कारण त्या कामात तुम्हाला स्वारस्य असते. तर मग शाश्वत हिताच्या सेवेला जीवनातील साध्या सांसारिक व्यवहारांपेक्षा खालच्या पातळीवर ठेवायचे काय?

असे केल्यास परमेश्वराने आपल्यासाठी ठेवलेला आशीर्वाद आपण गमावतो. शब्बाथ हा निष्क्रिय, निरुपयोगी रिकामेपणाचा दिवस नाही. घरात असो वा मंडळीत असो, सेवाभाव प्रकट झाला पाहिजे. ज्याने आपल्याला सांसारिक कामासाठी सहा दिवस दिले, त्याने सातवा दिवस आशीर्वादित करून तो स्वतःसाठी वेगळा ठेवला आहे. या दिवशी जो कोणी स्वतःला त्याच्या सेवेसाठी समर्पित करतो, त्याला तो विशेषरीत्या आशीर्वाद देतो.

स्वर्गातील सगळ्यांद्वारे शब्बाथ पाळला जातो, परंतु निष्क्रिय, निरुत्साही रीतीने नव्हे. या दिवशी आत्म्याची प्रत्येक शक्ती जागृत असावी कारण आपण देवाशी आणि आपला तारणारा ख्रिस्ताशी भेटणार नाही काय? आपण त्याला विश्वासाच्या डोळ्यांनी पाहू शकतो. प्रत्येक आत्म्याला ताजेतवाने करण्याची आणि आशीर्वाद देण्याची त्याला तीव्र इच्छा आहे.

शब्बाथाच्या सभांना रंजक बनवण्यासाठी प्रत्येकाने स्वतःचा भाग उचलला पाहिजे. आपण फक्त औपचारिकतेसाठी जमू नये; तर विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी, दैनंदिन अनुभवांची मांडणी करण्यासाठी, कृतज्ञतेची अभिव्यक्ती करण्यासाठी, दैवी प्रकाशनाची प्रामाणिक इच्छा व्यक्त करण्यासाठी जमावे जेणेकरून तुम्ही देवाला आणि त्याने पाठविलेल्या येशू ख्रिस्ताला जाणू शकाल यासाठीच जमावे. ख्रिस्ताविषयी एकत्र विचारमंथन करणे आत्म्याला जीवनाच्या परीक्षांसाठी आणि संघर्षांसाठी बळ देते. कधीही असे समजू नका की आपण स्वतःला सर्वांपासून मागे घेऊनही ख्रिस्ती राहू शकतो. प्रत्येक मनुष्य मानवतेच्या महान जाळ्याचा एक भाग आहे, आणि प्रत्येकाचा अनुभव मोठ्या प्रमाणात त्याच्या सहकाऱ्यांच्या अनुभवांवर अवलंबून असतो.

आपण देवाची उपासना करण्यासाठी एकत्र जमतो त्या सभांमधून मिळायला हवे तितक्याही आशीर्वादाचा दहावा भाग देखील आपण मिळवित नाही. आपल्या जाणिवेच्या क्षमता अधिक तीक्ष्ण होण्याची गरज आहे. एकमेकांच्या संगतीत राहणे आपल्यामध्ये आनंद निर्माण करायला हवे. आपल्याकडे अशी आशा असताना आपली अंतःकरणे देवाच्या प्रेमाने प्रज्वलित का होत नाहीत?

प्रत्येक धार्मिक सभेला जाताना आपण अशी जागृत आध्यात्मिक जाणीव घेऊन गेलो पाहिजे की देव आणि त्याचे दूत त्या स्थळी उपस्थित आहेत आणि प्रत्येक खऱ्या उपासकाबरोबर कार्यरत आहेत. उपासनेच्या स्थळी प्रवेश करताना परमेश्वराला विनंती करा की तुमच्या हृदयातील सर्व दुष्टता तो दूर करो. त्याच्या घरात तुम्ही फक्त तेच घेऊन या ज्यावर तो आशीर्वाद देऊ

शकेल. देवाच्या मंदिरात गुडघे टेकवे आणि ख्रिस्ताच्या रक्ताने ज्यांची खरेदी झाली आहे त्या त्याच्याच गोष्टी त्याला समर्पित करा. सभेतील वक्त्यासाठी किंवा पुढाऱ्यासाठी प्रार्थना करा. जो "जीवनाचे वचन" मांडणार आहे त्याच्याद्वारे महान आशीर्वाद लाभावा म्हणून प्रार्थना करा. स्वतःसाठी आशीर्वाद घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करा.

जे स्वतःला त्याच्या सेवेसाठी अशा रीतीने तयार करतात त्यांना देव आशीर्वाद देतो. त्यांनी पवित्र आत्म्याच्या आश्वासनाचा अनुभव काय असतो हे समजेल, कारण त्यांनी विश्वासाद्वारे ख्रिस्तास स्वीकारले आहे.

उपासनेचे स्थळ अतिशय साधे असले तरी ते देवाच्या दृष्टीने तितकेच मान्य आहे. जे जन आत्म्याने व सत्याने आणि पवित्रतेच्या सौंदर्यात देवाची उपासना करतात, त्यांच्यासाठी ते स्थान स्वर्गद्वारासारखे वाटेल. विश्वासणाऱ्यांची संख्या फार थोडी असू शकते, तरी देवाच्या दृष्टीने ते अत्यंत मौल्यवान आहेत. सत्याच्या कुऱ्हाडीने हे लोक जगाच्या खाणीतून रठ्ठ दगडांसारखे कापून काढले गेले आहेत आणि देवाच्या कार्यशाळेत आणले गेले आहेत घडवण्यासाठी आणि आकार देण्यासाठी. तरीही, जरी ते रठ्ठ अवस्थेत असले तरी देवाच्या दृष्टीने ते मौल्यवानच आहेत. कुऱ्हाड, हातोडा आणि छन्नी या परीक्षेच्या साधनांचा उपयोग एका कुशल कारागिराच्या हातात आहे; या साधनांचा उपयोग नाश करण्यासाठी नव्हे, तर प्रत्येक आत्म्याचे परिपूर्णत्व घडवण्यासाठी होतो. महालात बसविण्यात येणाऱ्या चमकदार मौल्यवान दगडांसारखे बनवून देव आपल्याला स्वर्गातील त्याच्या मंदिरात स्थान द्यायचा विचार करतो.

देवाने आपल्या लोकांसाठी ठेवलेल्या नेमणुका आणि आशीर्वाद यांच्या मर्यादा नाहीत. कृपासन स्वतःच सर्वोच्च आकर्षण आहे, कारण त्यावर तो बसलेला आहे ज्याला आपण "पिता" म्हणून संबोधण्याची परवानगी आपल्याला आहे. परंतु देवाने तारणाच्या व्यवस्थेला केवळ स्वतःच्या प्रेमाने पूर्ण मानले नाही. त्याने आपल्या नियोजनाने आपल्या वेदीजवळ आपल्या स्वभावाचे वस्त्र परिधान केलेला एक मध्यस्थ ठेवला आहे. आपला मध्यस्थ

म्हणून त्याचे कार्य म्हणजे आपल्याला देवापुढे त्याची मुले म्हणून सादर करणे. ख्रिस्त त्यांना मध्यस्थी करून देतो ज्यांनी त्याला स्वीकारले आहे. आपल्या स्वतःच्या गुणांच्या सामर्थ्याने तो त्यांना स्वर्गीय राजाच्या घराण्यातील, राजकिय कुटुंबातील सदस्य होण्याचे अधिकार देतो. आणि पिताही ज्याने आपल्या रक्ताद्वारे आपली सुटका केली त्या ख्रिस्ताविषयीची आपली अनंत प्रेमभावना याने प्रकट करतो की, तो ख्रिस्ताच्या मित्रांना आपल्या मित्रांप्रमाणे स्वीकारतो व त्यांचे स्वागत करतो. ख्रिस्ताने केलेल्या प्रायश्चित्तावर तो संतुष्ट आहे. आपल्या पुत्राच्या देहधारणेने, त्याच्या जीवनाने, मृत्यूने आणि मध्यस्थीच्या सेवाकार्याने पित्याचे गौरव होते.

देवाचे मूल दयेच्या सिंहासनाजवळ येताच, ते लगेच महान मध्यस्थाचे गिऱ्हाईक बनतात. जेव्हा ते प्रथमच पश्चात्तापाचा स्वर काढतात आणि क्षमेसाठी विनवणी करतात, तेव्हा ख्रिस्त त्याचा मामला स्वतःचा मानतो आणि त्या विनंतीला पित्यापुढे स्वतःची विनंती म्हणून मांडतो.

ख्रिस्त आपल्या वतीने मध्यस्थी करीत असताना, पिता आपल्या कृपेचे सर्व खजिने आपल्या वापरासाठी उघडे करतो आपण त्यांचा आनंद घ्यावा आणि इतरांपर्यंत ते पोहोचवावेत म्हणून. ख्रिस्त म्हणतो, “माझ्या नावाने मागा.” आणि पुढे असे म्हणतो, “मी असे म्हणत नाही की मी तुमच्यासाठी पित्याशी विनंती करीन; कारण पिताच तुम्हांवर प्रेम करतो, कारण तुम्ही माझ्यावर प्रेम केले आहे. माझ्या नावाचा वापर करा यामुळे तुमच्या प्रार्थना प्रभावी होतील, आणि पिता तुम्हांला आपल्या कृपेचे धन देईल. म्हणून, ‘तुम्ही अजून माझ्या नावाने काही मागितले नाही. मागा म्हणजे तुम्हांला मिळेल, ह्यासाठी की तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा.” (योहान १६:२४)

देव आपल्या आज्ञाधारक मुलांनी आपल्याकडून आशीर्वादाचा दावा करावा आणि स्तुती व कृतज्ञतेसह त्याच्या समोर यावे, अशी त्याची इच्छा आहे. देव हा जीवनाचा आणि सामर्थ्याचा झरा आहे. जो त्याच्या आज्ञा पाळतो, त्यासाठी तो वाळवंटालाही फलद्रूप शेत बनवू शकतो, कारण हे त्याच्या नावाच्या गौरवासाठी आहे. त्याने आपल्या निवडलेल्या लोकांसाठी इतके

काही केले आहे की ज्यामुळे प्रत्येक मनात कृतज्ञतेची प्रेरणा निर्माण व्हावी, आणि इतकी अल्प स्तुती त्याला दु:ख देते. त्याच्या लोकांनी अधिक स्पष्टरीत्या हे दाखवावे की त्यांचे आनंद आणि प्रसन्नतेचे कारण आहे हीच त्याची इच्छा आहे.

देवाने आपल्या लोकांशी केलेले व्यवहार सतत स्मरणात ठेवले गेले पाहिजेत; त्यांची वारंवार पुनरावृत्ती झाली पाहिजे. प्राचीन इस्राएलाशी देवाने ज्या रीतीने व्यवहार केले, त्यामध्ये परमेश्वराने किती वेळा किती स्मारक-चिन्हे उभारली होती! भूतकाळातील इतिहास ते विसरू नयेत म्हणून देवाने मोशेला आज्ञा केली की हे प्रसंग गीतात लिहावेत, जेणेकरून पालक ते आपल्या मुलांना शिकवू शकतील. या आठवणी गोळा करून सर्वांच्या दृष्टीस पडतील अशा ठिकाणी ठेवाव्यात, अशीही आज्ञा केली होती. मुलांनी या स्मारकांविषयी विचारल्यावर संपूर्ण कथा पुन्हा सांगता येईल, यासाठी विशेष दक्षता घेतली गेली. अशा प्रकारे देवाने आपल्या लोकांची केलेली काळजी, त्यांचे रक्षण, त्याची उदार चांगुलपणा आणि दया या सर्वांचा इतिहास सतत स्मरणात राहिला. आपल्यालाही अशी सूचना दिली आहे: “पूर्वीचे दिवस आठवा; त्यांमध्ये तुम्हांला प्रकाश मिळाल्यावर तुम्ही दु:खाबरोबर फार धीराने झोंबी केली;” (इब्री १०:३२) या पिढीतील आपल्या लोकांसाठीही परमेश्वराने अद्‌भुत कार्य करणारा देव म्हणून महान गोष्टी केल्या आहेत. देवाच्या कार्यांचा भूतकाळातील इतिहास तरुण आणि वृद्ध दोघांसमोरही वारंवार ठेवले पाहिजे. देवाचा चांगुलपणा सतत सांगितला पाहिजे आणि त्याच्या अद्‌भुत कार्यांबद्दल आपण त्याची स्तुती केली पाहिजे.

आपल्याला एकत्र जमणे सोडू नका असे सांगितले आहे; परंतु या सभा केवळ आपल्याला ताजेतवाने करण्यासाठी नसाव्यात. आपणास मिळालेला दिलासा आणि प्रोत्साहन इतरांपर्यंत पोहोचवण्याची अधिक उत्साहाची प्रेरणा या सभांनी आपल्यात निर्माण केली पाहिजे. देवाच्या गौरवासाठी आपल्यामध्ये तीव्र जिव्हाळा असला पाहिजे; आणि आपल्या चेहऱ्यावरच्या खिन्नतेने किंवा

उतावळेपणाने बोललेल्या शब्दांनी असा आभासही निर्माण होऊ नये की देवाच्या आज्ञा आपल्या स्वातंत्र्यावर बंधन घालतात. या दुःख, निराशा आणि पापाने भरलेल्या जगातदेखील परमेश्वराला आपल्याला आनंदी, उत्साही, आणि त्याच्या सामर्थ्यात दृढ राहावे असे वाटते. आपल्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाला प्रत्येक बाबतीत स्पष्ट साक्ष देण्याचा सन्मान मिळाला आहे. आपल्या चेहऱ्यात, स्वभावात, शब्दात आणि चरित्रात आपण देवाची सेवा चांगली आहे, याची साक्ष द्यावी. अशा रीतीने आपण जाहीर करतो की: "परमेश्वराचे नियमशास्त्र परिपूर्ण आहे, ते मनाचे पुनरुज्जीवन करते; परमेश्वराचा निर्बंध विश्वसनीय आहे. तो भोळ्यांना समंजस करतो." (स्तोत्र १९:७)

आपल्या धर्माचे उज्ज्वल आणि आनंददायी स्वरूप त्या सर्वांमध्ये प्रकट होते जे दररोज स्वतःला देवासाठी समर्पित करतात. ज्या परीक्षा कठीण वाटतात त्यांचे दुःखद वर्णन करून आपण देवाचा अपमान करू नये. कोणतीही परीक्षा जर शिक्षकाप्रमाणे स्वीकारली, तर ती शेवटी आनंद उत्पन्न करते. संपूर्ण आध्यात्मिक जीवन हे उंचावणारे, उन्नत करणारे, चांगले बनवणारे, आणि चांगल्या शब्दांनी व चांगल्या कृतींनी सुवासित असावे. शत्रूला हे फार आनंदाचे वाटते की आत्मे नैराश्याने खचलेले, निराश, तक्रारी करत आणि उसासे टाकत राहावेत; कारण त्याला आपल्या विश्वासाचा प्रभाव लोकांच्या नजरेत अशाच प्रकारे दिसावा असे वाटते. पण देवाची इच्छा तशी नाही देव इच्छितो की मनाने खालच्या पातळीवर जाऊ नये. त्याची इच्छा आहे की प्रत्येक आत्म्याने तारणाऱ्याच्या धरून ठेवणाऱ्या सामर्थ्यात विजय मिळवावा. स्तोत्रकार म्हणतो: "परमेश्वराला श्रेय द्या, परमेश्वराला गौरव व सामर्थ्य ह्यांचे श्रेय द्या. परमेश्वराला त्याच्या वैभवी नावाचे श्रेय द्या; पावित्र्याने युक्त होऊन परमेश्वराची आराधना करा." आणखी तो म्हणतो: "हे परमेश्वरा, मी तुझी थोरवी गाईन, कारण तू माझा उद्धार केला आहेस; तू माझ्या वैऱ्यांना माझ्यामुळे हर्ष करू दिला नाहीस. हे परमेश्वरा, माझ्या देवा, मी तुझा धावा केला आणि तू मला रोगमुक्त केलेस. हे परमेश्वरा, तू माझा जीव अधोलोकातून वर काढलास; गर्तेत पडलेल्यांमधून तू मला जिवंत

राखलेस. अहो परमेश्वराचे भक्तहो, त्याचे गुणगान गा; आणि त्याच्या पावित्र्याचे स्मरण करताना त्याचा धन्यवाद करा. ” (स्तोत्र २९:१, २; ३०:१-४)

खालील पृथ्वीवरील देवाची मंडळी आणि वरच्या स्वर्गातील देवाची मंडळी दोन्ही एकच आहेत. पृथ्वीवरील विश्वासणारे आणि स्वर्गातील कधीही न पाप केलेल्या सृष्टी मिळून एकच मंडळी बनते. पृथ्वीवर देवाची उपासना करण्यासाठी जमणाऱ्या संतांच्या सभांमध्ये प्रत्येक स्वर्गीय बुद्धिमत्ता रस घेते. स्वर्गातील अंतर्गत अंगणात ते पृथ्वीवरील बाह्य अंगणात ख्रिस्तासाठी साक्ष देणाऱ्यांचे साक्ष ऐकतात; आणि पृथ्वीवरील उपासकांची स्तुती व कृतज्ञता स्वर्गीय गाण्यात मिसळली जाते, आणि आनंद व स्तुतीने स्वर्गीय वातावरण भरून जातात कारण पडलेल्या आदामाच्या संततीसाठी ख्रिस्ताने व्यर्थ मरण पत्करले नाही. जसे देवदूत स्वर्गातील झऱ्यातून थेट पितात, तशीच पृथ्वीवरील संत कृपासनापासून वाहणाऱ्या स्वच्छ प्रवाहांतून पितात जे आपल्या देवाच्या नगरीस आनंद देतात. अरे, काश आपण सर्वांनी स्वर्ग पृथ्वीच्या किती जवळ आहे हे खरोखर समजून घेतले असते! पृथ्वी जन्मापासून मनुष्यांना माहिती नसतानाही, त्यांच्या सोबत प्रकाशाचे देवदूत सहचर म्हणून असतात. एक शांत साक्षीदार प्रत्येक जिवंत आत्म्यावर पहारा देतो त्याला ख्रिस्ताकडे आकर्षित करण्याच्या हेतूने. जोपर्यंत आशा आहे, आणि मनुष्य पवित्र आत्म्याला नाकारत स्वतःच्या शाश्वत नाशाकडे जात नाही, तोपर्यंत स्वर्गीय शक्ती त्याचे रक्षण करतच असतात. म्हणून आपण हे सदैव स्मरणात ठेवले पाहिजे की पृथ्वीवरील संतांच्या प्रत्येक सभेमध्ये देवाचे देवदूत उपस्थित असतात ते साक्ष, भजने आणि प्रार्थना ऐकतात. आणि हेही लक्षात ठेवले पाहिजे की आपल्या स्तुतीला वरच्या स्वर्गातील देवदूतांच्या गायनाचा गट साथ देतो.

शब्बाथापासून शब्बाथापर्यंत जेव्हा तुम्ही एकत्र जमता, तेव्हा ज्याने तुम्हांला अंधारातून आपल्या अद्भुत प्रकाशात बोलाविले त्याची स्तुतीगायन करा. “ज्याने आपल्यावर प्रेम केले आणि आपल्या रक्ताने आपली पापे धुऊन काढली त्याला” आपल्या हृदयातील उपासना अर्पण करा. वक्त्याच्या प्रत्येक

शब्दाचे मुख्य ओझे ख्रिस्ताचे प्रेम असू द्या. स्तुतीच्या प्रत्येक गीतात ते सोप्या आणि सरळ भाषेत व्यक्त होऊ द्या. देवाच्या आत्म्याची प्रेरणा तुमच्या प्रार्थनांना दिशा देवो. जेव्हा “जीवनाचे वचन” उच्चारले जाते, तेव्हा तुमचा अंतःकरणातील प्रतिसाद हे साक्ष देऊ दे की तुम्ही ते संदेश स्वर्गाकडून आलेले म्हणून स्वीकारता. मला माहीत आहे, हे अगदी जुन्या पद्धतीचे वाटेल; पण हे “जीवनाची भाकर” उपाशी आत्म्यास दिल्याबद्दल देवासाठी कृतज्ञतेचे अर्पण ठरेल. पवित्र आत्म्याच्या या प्रेरणेला दिलेला प्रतिसाद तुमच्या आत्म्याला बळकटी देईल आणि इतरांसाठीही प्रोत्साहन बनेल. हे दर्शवेल की तुम्ही देवाच्या इमारतीमध्ये जिवंत दगड आहात जे प्रकाश उत्सर्जित करतात.

आपल्या अनुभवातील काळ्या अध्यायांकडे पाहण्याऐवजी, देवाच्या महान दयेच्या आणि प्रेमाच्या प्रकटीकरणांकडे पाहण्यास सुरुवात केली, तर आपले स्तवन तक्रारींपेक्षा खूपच जास्त होईल. आपण देवाच्या प्रेमळ विश्वासार्हतेविषयी बोलू आपल्या मेंढरांच्या कळपाचा खरा, कोमल, दयाळू मेंढपाळ, ज्याबद्दल तो म्हणतो की, “कोणीही त्यांना माझ्या हातातून हिसकावून नेऊ शकणार नाही.” अशा वेळी हृदयाची भाषा स्वार्थी कुरकुर किंवा तक्रार नसून, स्तुतीच्या स्वच्छ प्रवाहांसारखी बाहेर पडेल. “खरोखर माझ्या आयुष्याचे सर्व दिवस मला कल्याण व दया ही लाभतील; आणि परमेश्वराच्या घरात मी चिरकाल राहीन. तू बोध करून मला मार्ग दाखवशील, आणि त्यानंतर गौरवाने माझा स्वीकार करशील. स्वर्गात तुझ्याशिवाय मला कोण आहे? पृथ्वीवर मला तुझ्याशिवाय दुसरा कोणीही प्रिय नाही.” (स्तोत्र २३:६; ७३:२४, २५)

आपल्या या पृथ्वीवरील यात्रेत जाताना आपल्या आत्मिक गीतांचे सूर का जागृत करू नयेत? आपण आपल्या साधेपणाकडे आणि उष्ण भक्तीच्या जीवनाकडे का परतू नये? आपण अधिक आनंदी नसण्याचे कारण म्हणजे आपण आपले पहिले प्रेम गमावले आहे. मग चला, आपण उत्साही होऊ या

आणि पश्चात्ताप करू या नाहीतर कंदीलधारक आपल्यापासून आपल्या स्थानावरून हलविला जाईल.

स्वर्गात देवाचे मंदिर उघडे आहे, आणि त्याचा उंबरठादेखील त्या गौरवाने उजळलेला आहे जो प्रत्येक त्या मंडळीसाठी राखून ठेवलेला आहे जी देवावर प्रेम करते आणि त्याच्या आज्ञा पाळते. आपल्याला अभ्यास, मनन आणि प्रार्थना करणे आवश्यक आहे. मग आपल्याला स्वर्गीय मंदिराच्या अंतर्गत प्रांगणाचे आध्यात्मिक दर्शन होईल. सिंहासनाभोवती असलेल्या स्वर्गीय गायनसमूहाच्या स्तुतीगीतांचे आणि कृतज्ञतेच्या सुरांचे आपणही स्वर टिपू. सिय्योन उठून तेजस्वी होईल तेव्हा तिचे प्रकाशकिरण अत्यंत भेदक असतील, आणि संतांच्या सभांमध्ये स्तुती आणि कृतज्ञतेची मौल्यवान गीते ऐकू येतील. छोट्यामोठ्या निराशांवर आणि अडचणींवरची कुजबुज संपेल. आपण सोन्याचा डोळ्यांसाठीचा लेप लावू तेव्हा आपण त्यापलीकडील वैभव पाहू. विश्वास सैतानाच्या दाट सावल्या छेदून पुढे जाईल, आणि आपण पाहू की आपला महान मध्यस्थ आपल्या स्वतःच्या गुणवत्तेचा धूप आमच्या वतीने अर्पण करीत आहे. जेव्हा आपण हे वास्तव जसे आहे तसे परमेश्वर आपल्याला जसे पाहावेसे वाटते तसे पाहू लागतो, तेव्हा देवाच्या प्रेमाची महानता आणि त्याची अपार विविधता यांची जाणीव आपल्याला भरून टाकेल.

देव शिकवतो की आपण त्याच्या घरात एकत्र जमावे परिपूर्ण प्रेमाची गुणवैशिष्ट्ये विकसित करण्यासाठी. हे पृथ्वीवरील राहणाऱ्यांना त्या निवासस्थानांसाठी तयार करील, ज्या ख्रिस्ताने त्याच्यावर प्रेम करणाऱ्या सर्वांसाठी तयार करण्यासाठी आपणास सोडून गेला आहे. तेथे स्वर्गात ते त्याच्या पवित्रस्थानात एकत्र जमतील, शब्बाथापासून शब्बाथापर्यंत, एका नविनचंद्रापासून दुसऱ्या नविनचंद्रापर्यंत, सिंहासनावर बसलेल्या त्याच्या आणि कोकराच्या स्तुतीसाठी, सर्वोच्च स्तुतीगीतांत, स्तुती आणि कृतज्ञतेच्या सुरांत एकरूप होण्यासाठी आणि हे सर्व सदैव आणि सदैव चालू राहील.